# ई - पोलीस पत्रिका

दि. २१/०८/२०२४ अनु.क्र.१५१

## (अमरावती शहर पोलीसांची २०२४ ची उद्दिष्टे)

- नागरिकांशी मित्रत्वाचे संबध.
- उच्च मनोबल युक्त व तणाव मुक्त पोलीसदल.
- महिला, मुले व ज्येष्ठ नागरिकांची सुरक्षा.
- जातीय सलोखा वाढविणे.
- संघटित गुन्हेगारी आणि आतंकवादी यांचे विरूद्ध कठोर कारवाई.
- रस्त्यावरील गुन्हेगारीवर नियंत्रण/सुरक्षा.
- पोलीस कोठडीत गुन्हे घडू नदेणे.
- आरोपी पोलीसांचे ताब्यातून पळून जाऊ नयेत.
- “सुरक्षित व सुखकर अमरावती” हा आमचा संकल्प आम्ही व्यापक लोकसहभागातून साध्य करू.

# भाग-१

## पदोन्नती/बदली/प्रशिक्षण/रजा

## बदली

**१.पोआअ/आस्था-१/मुदतपुर्व बदली/७२८०/२०२४ अमरावती शहर दिनांक ०९/०८/२०२४**

**संदर्भ :-** १) पोलीस महासंचालक, म.रा. मुंबई यांचे पत्र क्रमांक :- पोमसं/३/अधिसूचना/१४/२०१४ /७३ दिनांक २५/०२/२०१५

२) महाराष्ट्रपोलीस अधिनियम (सुधारणा) अध्यादेश क्रमांक २, दिनांक १६/०२/२०१५

३) महाराष्ट्र शासन गृहविभाग, शासन परिपत्रक क्रमांक न्यायाप्र ३११५/प्र.क्र.८८/पोल-३, दिनांक ०१ जुलै २०१५

४) सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र.एसआरव्ही-२०२२/प्र.क्र.२९/कार्या.१२दि. २७.५.२०२२

**आदेश**

उपरोक्त संदर्भात नमुद केल्याप्रमाणे महाराष्ट्र पोलीस अधिनियम (सुधारणा) अध्यादेश-२०१५, मधील कलम २२ न च्या तरतुदीनुसार पोलीस आयुक्तालय स्तरावरील पोलीस आस्थापना मंडळ यांना प्रदान असलेल्या अधिकाराचा वापर करुन खालील नमुद पोलीस अंमलदार यांची विनंतीवरून त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या प्रमाणे सांगोपांग विचार करुन मुदतपुर्व बदली करण्यात येत आहे.

| अ.क्र. | पदनाम | ब. क्र. | पोलीस अंमलदाराचे नाव | कोठुन | कोठे |
|---|---|---|---|---|---|
| १. | पोशि | १८१४ | अरविंद त्र्यंबक कळसकर | पो.स्टे.नांदगाव पेठ | पोलीस मुख्यालय |

## रजा

**१.पोआअ/आस्था-५श्वान दंश रजा/७०११/२०२४ अमरावती शहर दिनांक ०५/०८/२०२४**

**आदेश**

मपोहवा/१३३२, आशा वरठे नेमणुक पोलीस निरीक्षक, पो.स्टे.फ्रेजरपुरा, यांना दि.०३/०५/२०२४ ला श्वॉन दंश झाल्याने(कुत्रा चावल्याने) श्वॉन दंशावर उपचाराकरीता महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण अटी व शर्ती) नियम १९८१मधील नियम ९(१४)(आय) आणि महाराष्ट्र पोलीस निमावली भाग-१ मधील नियम २७३ (ड) तरतुदिनुसार वैद्यकीयप्रमाण पत्राच्याआधारे त्यांना दि. ०३/०५/२०२४ ते दि. ०७/५/२०२४ पर्यत एकूण ०५ दिवस विशेष नैमित्तिक रजा (जी रजाखात्यावर खर्चीटाकली जाणार नाही ) मंजुर करण्यात येत आहे.

# भाग-२

## शिक्षा/निलंबन/पुन्हा स्थापना/बक्षिस/सेवानिवृत्त/मयत/नाव कमीकरणे

## शिक्षा

**१.पोआअ/विचौ-२/कसुरी अहवाल/बिट मार्शल/अंतिम आदेश/पोना-१३९३ वानखडे + १/६८२९/२०२४**

**अमरावती शहर दिनांक २९/०७/२०२४**

**संदर्भ क्रमांक** :- १) पोलीस निरीक्षक, पोलीस नियंत्रण कक्ष, अमरावती शहर यांचे कडील जावक क्रमांक ०८/२०२४,दिनांक १०/०१/२०२४ रोजीचा कसुरी अहवाल.
२) या कार्यालयाची कारणे दाखवा नोटीस क्र.पोआअ/विचौ-२/कसुरी अहवाल/ गैरहजर/बिट मार्शल/पोहवा-३२८ इंगळेकर + ५/९१६/२०२४, दिनांक २५/०१/२०२४

**कसुरदारचे नाव :-** (१) पोना/१३९३ जगदीश वानखडे, नेमणुक पो.स्टे.राजापेठ, अमरावती शहर.
(२) पोशि/१३९४ अतुल शिंगनाथ, नेमणुक पो.स्टे.नागपुरी गेट, अमरावती शहर.

**थोडक्यात कसुरी :-**

खालील नमुद पोलीस अंमलदार यांचे नावासमोर दर्शविलेल्या प्रमाणे बिट मार्शल कर्तव्य नेमण्यात आलेले होते. दिनांक १०/०१/२०२४ रोजी अमरावती शहरामध्ये ट्रान्सपोर्ट यांनी संपाचे आयोजन केल्याने मा.पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-१, यांनी ०६.५३ वा.सर्व CR मोबाईल, बिट मार्शल यांना कॉल करुन सतर्क राहण्याबाबत व ज्यांचे उत्तर नाही आले तशी नमुद पोलीस अंमलदार यांची नोंद घेणेबाबत सांगीतले होते.मा.पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-१ यांनी सांगीतल्या प्रमाणे वायलेस लॉग बुक पुष्ठ क्र.१६, दिनांक १०/०१/२०२४ रोजी ०६.५५ वा.VHF व्दारे कॉल केला असता, खालील नमुद तुमचे उत्तर आले नाही.तशी तुमची गैरहजेरी बाबत नोंद घेण्यात आली आहे. तरी तुम्ही वरिष्ठांना कोणत्याही प्रकारची पुर्व सुचना न देता कर्तव्यावरुन अनाधिकृतपणे गैरहजर राहिले असुन तुम्ही पोलीस विभागा सारख्या शिस्तप्रिय खात्यात लोकसेवक असल्याचे कोणतेही भान न ठेवता अत्यंत बेशिस्त व बेजबाबदारपणाचे वर्तन केलेले आहे. तुम्हाला वरिष्ठांनी नेमुन दिलेले कर्तव्य व्यवस्थीत पार न पाडता कर्तव्यावर गैरहजर राहता.तरी तुमचे हे कृत्य निष्काळजीपणाचे व बेजबाबदारपणाचे दिसुन आले आहे.तुम्ही पोलीस खात्यासारख्या शिस्तीच्या दलामध्ये कर्तव्यावर असुन अशोभनीय असे वर्तन केले आहे.

| अ.क्र. | पो.अंम.यांचे नाव, हुद्दा व ब.नं. | पो.स्टे.चे नाव | बिट मार्शल |
|---|---|---|---|
| १ | पोना/१३९३ जगदीश वानखडे | पो.स्टे.राजापेठ | बिट मार्शल-२ |
| २ | पोशि/१३९४ अतुल शिंगनाथ | पो.स्टे.नागपुरी गेट | बिट मार्शल-१ |

अशा प्रकारे तुम्ही उपरोक्त प्रकरणी कसुरी केल्याने तुमच्या या गैरवर्तन कसुरी बद्दल तुम्हास मुंबई पोलीस (शिक्षा व अपील) १९५६ नियम क्रमांक ३ (२) (४) चे तरतुदी नुसार **रु. २०००/-** दंडाची शिक्षा का करण्यात येवु नये ? म्हणुन कारणे दाखवा नोटीस देण्यात आली होती.सदर कारणे दाखवा नोटीस तुम्ही स्विकारली असुन त्यावर तुमचे स्पष्टीकरण सादर केलेले असुन सादर केलेल्या स्पष्टीकरणाचे अवलोकन करुन पुढील कर्तव्यात कामामध्ये सुधारणा करण्याची एक संधी देण्यात येवुन प्रस्तावित कारणे दाखवा नोटीसमध्ये देण्यात आलेल्या शिक्षेमध्ये अंशत: बदल करुन खालील प्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

## अंतिम आदेश

तरी वर नमुद कसुरदार यांनाउपरोक्त कसुरीबाबत मुंबई पोलीस (शिक्षा व अपील) नियम १९५६ चे नियम क्रमांक ३ मधील उप-नियम (२) मधील (ii) चे तरतुदी नुसार **"सक्त ताकीद"**ही शिक्षा देण्यात येत आहे.

**भाग-३**

# <u>वेतन/संरचना/वेतन निश्चितीती/वार्षीक वेतनवाढ/संकीर्ण</u>

## <u>वेतन निश्चितीती</u>

**१.पोआअ/आस्था-३/सु.वे.नि./पोहवा-३१६/७०९५/२०२४ अमरावती शहर      दिनांक ०६/०८/२०२४**

**<u>आदेश क्र.१</u>**

शासन अधिसुचना वित्त विभाग क्रमांक वेपुर-११२२/प्र.क्र.६/सेवा-९ दिनांक ०३ फेब्रुवारी २०२३ नुसार सेवाप्रवेश नियमातील तरतुदीनुसार सरळसेवेने नियुक्त झालेल्या कर्मचा-यांना ज्या पदावर दिनांक ०१ जानेवारी २००६ रोजी किंवा त्यानंतर या नियमांच्या जोडपत्र तीन नुसार सेवाप्रवेश वेतन अनुज्ञेय ठरते, अशा पदांवर दिनांक ०१ जानेवारी २००६ पुर्वी नामनिर्देशनाने अथवा पदोन्नतीने नियुक्त झालेल्या आणि दिनांक ०१ जानेवारी २००६ रोजी पोटनियम (१) कलम (अ) अन्वये वेतननिश्चिती केलेल्या शासकिय कर्मचा-याचे वेतन, सरळसेवा नियुक्तींसाठी जोडपत्र तीन मध्ये विहिती केलेल्या सेवाप्रवेश वेतनापेक्षा कमी निश्चिती होत असेल तर, ते दिनांक ०१ जानेवारी २००६ पासून उंचावून देण्यात यावे कि, ज्यामुळे अशा सेवाप्रवेश वेतनापेक्षा ते कमी असणार नाही असे नमूद करण्यात आले आहे.

**त्याअनुषंगाने पोलीस हवालदार /३१६, निळकंठ कैलास चव्हाण, नेमणुक शहर वाहतुक शाखा पश्चिम, अमरावती शहर,नेमणूक दिनांक १७.०२.२००३** यांची शासन अधिसुचना वित्त विभाग, दिनांक ०३.०२.२०२३ मधील तरतुदीप्रमाणे महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारीत वेतन) नियम-२००९ मधील जोडपत्र-३ मधील तरतुदीनुसार खालीलप्रमाणे सुधारीत वेतननिश्चिती करण्यात येत आहे.

| पदनाम | वेतनश्रेणी | ग्रेड पे |
|---|---|---|
| पोलीस शिपाई | रु.५२००-२०२००/- | रु.२०००/- |
| पोलीस नाईक | रु.५२००-२०२००/- | रु.२४००/- |

| विद्यमान वेतन व दिनांक | | | सुधारीत देय वेतन व दिनांक | | |
|---|---|---|---|---|---|
| वेतनवाढीचा दिनांक | विद्यमान वेतन बँड/वेतन श्रेणी मधील वेतन | | वेतनवाढीचा दिनांक | सुधारीत वेतन बँड/वेतन श्रेणी मधील वेतन | |
| | वेतन बँड | ग्रेड वेतन | | वेतन बँड | ग्रेड वेतन |
| ०१/०१/२००६ | ६२७०/- | रु.२०००/- | ०१/०१/२००६ | रु. ६४६०/-<br>**शासन अधिसुचना वित्त विभाग, दिनांक ०३.०२.२०२३ मधील तरतुदीप्रमाणे महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारीत वेतन) नियम-२००९ मधील जोडपत्र-३ नुसार अनुज्ञेय वेतन** | रु.२०००/- |
| ०१/०७/२००६ | रु.६२७०+२५०=६५२०/- | रु.२०००/- | ०१/०७/२००६ | रु.६४६०+२६०=६७२०/- | रु.२०००/- |
| ०१/०७/२००७ | रु.६५२०+२६०=६७८०/- | रु.२०००/- | ०१/०७/२००७ | रु.६७२०+२७०=६९९०/- | रु.२०००/- |
| ०१/०७/२००८ | रु.६७८०+२७०=७०५०/- | रु.२०००/- | ०१/०७/२००८ | रु.६९९०+२७०=७२६०/- | रु.२०००/- |
| ०१/०७/२००९ | रु.७०५०+२८०=७३३०/- | रु.२०००/- | ०१/०७/२००९ | रु.७२६०+२८०=७५४०/- | रु.२०००/- |
| ०१/०७/२०१० | रु.७३३०+२८०=७६१०/- | रु.२०००/- | ०१/०७/२०१० | रु.७५४०+२९०=७८३०/- | रु.२०००/- |
| ०१/०७/२०११ | रु.७६१०+२९०=७९००/- | रु.२०००/- | ०१/०७/२०११ | रु.७८३०+३००=८१३०/- | रु.२०००/- |
| ०१/०२/२०१२ | रु.७९००/-<br>पोना पदोन्नती झाल्याने विकल्प सादर केला असुन विकल्पानुसार देय वेतन | रु.२४००/- | ०१/०२/२०१२ | रु.८१३०/-<br>पोना पदोन्नती झाल्याने विकल्प सादर केला असुन विकल्पानुसार देय वेतन | रु.२४००/- |
| ०१/०७/२०१२ | रु.७९००+३००=८२००/-<br>विद्यमान पदावर नियमीत वेतनवाढ | रु.२०००/- | ०१/०७/२०१२ | रु.८१३०+३१०=८४४०/-<br>विद्यमान पदावर नियमीत वेतनवाढ | रु.२०००/- |
| ०१/०७/२०१२ | रु.८२००+३१०=८५१०/-<br>विकल्प सादर केल्याने पदोन्नतीच्या | रु.२४००/- | ०१/०७/२०१२ | रु.८४४०+३२०=८७६०/-<br>विकल्प सादर केल्याने पदोन्नतीच्या | रु.२४००/- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | पदावर पुर्नवेतननिश्चिती. | | | पदावर पुर्नवेतननिश्चिती. | |
| ०१/०७/२०१३ | रु.८५१०+३३०=८८४०/- | रु.२०००/- | ०१/०७/२०१३ | रु.८७६०+३४०=९१००/- | रु.२०००/- |
| ०१/०७/२०१४ | रु.८८४०+३४०=९१८०/- | रु.२४००/- | ०१/०७/२०१४ | रु.९१००+३५०=९४५०/- | रु.२४००/- |
| ०१/०७/२०१५ | रु.९१८०+३५०=९५३०/- | रु.२४००/- | ०१/०७/२०१५ | रु.९४५०+३६०=९८१०/- | रु.२४००/- |

दिनांक ०१/०१/२०१६ पासून पुढील वेतनात बदल होत नसल्याने सातव्या वेतन आयोगाप्रमाणे सुधारीत वेतननिश्तिची आवश्यकता नाही.

**(कल्पना बारवकर)**
पोलीस उपायुक्त (मुख्या.)
अमरावती शहर

प्रति,

पत्रव्यहार शाखा/सेवापट नोंदणी लिपीक/सीसीटीएनएस